**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**शासन परिपत्रक क्रमांक :अविप्र-१०.०८/प्र.क्र.१४/ अर्थसंकल्प-४.**
**दिनांक : ३ ,मे २००८.**
**संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक :अविप्र-१०.०८/प्र.क्र.१४/ अर्थसंकल्प-४.दिनांक : १७ एप्रिल, २००८.**

## परिपत्रक

संदर्भाधीन परिपत्रकान्वये सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखानुदान अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरित करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यास काही कालावधी लागणार असल्याने सर्व आहरण व संवितरण अधिका-यांना आवश्यक ती देयके अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्धारा प्राधिकारपत्रे तयार करुन काढता यावीत तसेच कोषागारात देयक सादर न करता (LOC officer ) थेट धनादेश निर्गमित करणा-या विभागांना प्राधिकारपत्र काढता यावे यासाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उणे (-) रकमेच्या देयकांची प्राधिकारपत्रे काढण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली होती . सदर सुविधा ही फक्त ,एप्रिल २००८ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

२. आता सन २००८-०९ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर झालेले अर्थसंकल्पिय अनुदानही अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर दर्शविण्यात आलेले आहे.तथापि सदर अनुदान अद्याप वितरित करण्यात आलेले नाही. प्रशासकीय विभागांकडून आहरण व संवितरण अधिका-यांपर्यंत अनुदान वितरणास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनुदान वितरण पूर्ण होईपर्यंत अनुदानाअभावी आहरण व संवितरण अधिका-यांना देयके सादर करणे शक्य होणार नाही ही बाब लक्षात घेता संदर्भाधीन परिपत्रकान्वये एप्रिल २००८ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उणे (-) रकमेच्या देयकांची प्राधिकारपत्रे काढण्याची सुविधा दिनांक ३१ मे २००८ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.प्र.कानडे)
उप सचिव, वित्त विभाग.

प्रति,
अ.मु.स./ प्र.स./ सचिव (सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग)
**प्रशासकीय विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालये ( प्रशासकीय विभागांमार्फत)**
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी
संचालक लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण भवन, नवी मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी
सर्व उप कोषागार अधिकारी (संचालक लेखा व कोषागारे, मुंबई.यांचेमार्फत)
वित्त विभागातील सर्व कार्यासने/निवडनस्ती, वित्त विभाग, अर्थसंकल्प-४